# राजश्री छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना.

## सतत विचारले जाणारे महत्वाचे प्रश्न

1) ईबीसी शिष्यवृत्तीसाठी कोणत्या प्रकारचे दस्तऐवज (कागदपत्रे) आवश्यक आहेत?

**उत्तर:**

i) एसएससी मार्कशीट आणि पुढील वर्षाचे मार्कशीट

ii) उमेदवार हा महाराष्ट्राचा अधिवास असल्याचे प्रमाणपत्र (अधिवास प्रमाणपत्र)

iii) कौटुंबिक वार्षिक उत्पन्नाचे प्रमाणपत्र. (उत्पन्न 08 लाखांपेक्षा कमी असणे आवश्यक आहे)

(उदा. विद्यार्थी हा शै.व. २०२१-२२ ला शिकत असेल तर त्याला उत्पनाचा दाखला हा २०२०-२१ या आर्थिक वर्षाचा द्यावा लागेल)

iv) प्रवेश शुल्क भरल्याची पावती.

v) CAP Allotment Letter (FREEZE -CONFIRMED)/Receipt Cum Acknowledgement Letter

vi) प्रतिज्ञापत्र. (संकेतस्थळावर उपलब्ध आहे)

vii) जात प्रमाणपत्र (SEBC उमेदवारासाठी)

viii) GAP प्रमाणपत्र, शिक्षणात अंतर असल्यास.

2) मी ईबीसी योजनेसाठी वडील किंवा आई किंवा भाऊ किंवा बहीण यांचे अधिवास प्रमाणपत्र अपलोड करू शकतो का?

उत्तर: नाही, ईबीसी योजनेसाठी फक्त उमेदवारांचे महाराष्ट्राचा अधिवास प्रमाणपत्र आवश्यक आहे.

3) सध्याच्या कोर्समध्ये 02 वर्षांचा GAP आहे; मी ईबीसी योजनेसाठी पात्र आहे का?

उत्तर: नाही, सध्याच्या अभ्यासक्रमाच्या कालावधीत 02 किंवा 02 वर्षांपेक्षा जास्त अंतर असलेले विद्यार्थी ईबीसी योजनेसाठी पात्र नाहीत.

4) कोणत्या प्रकारचे उमेदवार नूतनीकरण (Renewal) होय पर्याय निवडू शकतात?

उत्तर: जर उमेदवाराने मागील वर्षी शिष्यवृत्ती योजनेसाठी त्याच संस्था मधून अर्ज केला असेल, तर तो चालू शैक्षणिक वर्षासाठी नूतनीकरण-'होय' म्हणून हा पर्याय निवडू शकतो.

5) TFWS उमेदवार य योजनेसाठी अर्ज करू शकतो का?

उत्तर: नाही, जर उमेदवार TFWS सीट अंतर्गत प्रवेश घेत असेल तर तो ईबीसी योजनेसाठी पात्र नाही,

6) जर विद्यार्थ्याला इतर कोणत्याही विभागाकडून इतर शिष्यवृत्ती / स्टायपेंड मिळत असेल तर तो ईबीसी योजनेसाठी अर्ज करू शकतो का?

उत्तर: नाही,

7) माझे वडील जिवंत नाहीत; मी आईचे उत्पन्नाचे प्रमाणपत्र अपलोड करू शकतो का?

उत्तर: होय, आईचे उत्पन्नाच्या प्रमाणपत्रा सोबत वडिलांचे मृत्यू प्रमाणपत्र अपलोड करा.

8) माझे वडील पगारदार नाहीत, माझी आई पगारदार आहे, कोणाचे उत्पन्नाचे प्रमाणपत्र आवश्यक असेल?

उत्तर: वडील पगारदार नसल्याचे प्रतिज्ञापत्रासह आईच्या उत्पन्नाचे प्रमाणपत्र अपलोड करा.

(प्रतिज्ञापत्राबाबत उमेदवारांनी स्वतःच्या संस्थेत संपर्क साधावा )

9) मी संस्था स्तरावर Against CAP/Institute level प्रवेश घेतला आहे; मी ईबीसी योजनेसाठी अर्ज करण्यास पात्र आहे का?

उत्तर: नाही, Against CAP/Institute level स्तरावरील उमेदवार पात्र नाहीत, फक्त तेच उमेदवार ज्यांनी सेंट्रलाइझ प्रवेश प्रक्रिया (CAP) द्वारे प्रवेश घेतला आहे ते या योजनेसाठी पात्र आहेत.

10) महाराष्ट्र कर्नाटक सीमा क्षेत्र (MKB) उमेदवार EBC योजनेसाठी पात्र होऊ शकतात का?

उत्तर: होय, Type-E श्रेणीतील CAP अंतर्गत प्रवेश घेतलेले उमेदवार ईबीसी योजनेसाठी पात्र आहेत.

11) मी विवाहित आहे (महिला उमेदवार). वडील किंवा पती यांच्या पैकी कोणाचे उत्पन्न प्रमाणपत्र अपलोड करू?

उत्तर: जर महिला उमेदवार विवाहित असेल तर, पतीचे उत्पन्नाचे प्रमाणपत्र व सोबत विवाह प्रमाणपत्र/ नाव बदलेले राजपत्र प्रमाणपत्र अपलोड करा.

12) OBC/SC/NT/VJNT/ST उमेदवार ईबीसी योजनेसाठी अर्ज करू शकतात का?

उत्तर: नाही, OBC/SC/NT/VJNT/ST उमेदवार या योजनेसाठी पात्र नाहीत, फक्त CAP अंतर्गत प्रवेश असलेले व प्रवेशाची श्रेणी खुली आहे असेच उमेदवार पात्र आहेत.

13) माझा प्रवेश SEBC श्रेणी अंतर्गत आहे, मी ईबीसी योजनेसाठी अर्ज करू शकतो का?

उत्तर: होय, विद्यार्थी SEBC प्रवर्गातील असल्याचे नमूद करणाऱ्या विद्यार्थ्याचे जात प्रमाणपत्र आवश्यक आहे.

14) माझा प्रवेश EWS श्रेणी अंतर्गत आहे, मी या योजनेसाठी अर्ज करू शकतो?

उत्तर: होय, चालू आर्थिक वर्षासाठी पालकांचे EWS प्रमाणपत्र आवश्यक आहे

15) माझा प्रवेश श्रेणी प्रकारचे OMS (महाराष्ट्र राज्याबाहेर) आहे, मी ईबीसी योजनेसाठी अर्ज करू शकतो का?

उत्तर: नाही OMS सीट प्रकारातील उमेदवार या योजनेसाठी पात्र नाही

16) अभिमत विद्यापीठ (Deemed University) किंवा खाजगी विद्यापीठातील (Private University) विद्यार्थी ईबीसी योजना साठी पात्र आहेत का?

उत्तर: नाही फक्त CAP प्रवेश प्रक्रिया (CAP) द्वारे प्रवेश केलेले उमेदवार EBC योजनेसाठी अर्ज करण्यास पात्र आहेत

17) ह्या योजनेसाठी आधार क्रमांक द्वारे नोंदणी आवश्यक आहे का?

उत्तर: होय विद्यार्थाकडे स्वतःचे आधार क्रमांक असणे आवश्यक आहे व ते बँकेला लिंक असणे गरजेचे आहे

18) माझ्याकडे दोन बँक खाते आहे तर माझा कोणत्या बँक मध्ये शिष्यवृत्ती रक्कम जमा होईल ?

उत्तर: ज्या बँक खात्यामध्ये आधार क्रमांक लिंक असेल त्या बँक मध्ये शिष्यवृत्ती रक्कम जमा होईल

19) आधार क्रमांक फॉर्म मध्ये उपडेट करत असताना Aadhar Already Exiest असा error येत आहे तर पुढे काय करता येईल?

उत्तर: Aadhar Already Exiest असा error येत असेल तर तुमचे दोन User ID तयार झाले आहे ,अशावेळी एक User ID हा Deactivate करावा लागतो त्यासाठी संस्थेत संपर्क साधावा.

## माहितीपत्रकात वापरलेले संक्षेप.

- EBC - राजश्री छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना.
- AICTE - अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद.
- CAP कॅप - केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया.
- EWS - आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक.
- OMS - महाराष्ट्र राज्याबाहेरील.
- SSC - माध्यमिक शालेय प्रमाणपत्र.
- TFWS - शिक्षण शुल्क माफी योजना.
- SEBC उमेदवार - विशेष मागास वर्ग.
- Deemed University – अभिमत विद्यापीठ
- Private University - खाजगी विद्यापीठ.
- Against CAP /Institute Level - "इन्स्टिट्यूशनल कोटा" म्हणजे वेळोवेळी शासन किंवा योग्य प्राधिकरणाने घोषित केल्याप्रमाणे संस्था स्तरावर पात्र उमेदवारांच्या प्रवेशासाठी उपलब्ध जागा;
- अल्पसंख्याक उमेदवारी.- राज्यातील विशिष्ट भाषिक किंवा धार्मिक अल्पसंख्याक समुदायाचे आणि अधिवेशनाद्वारे शासनाने अधिसूचित केलेले महाराष्ट्र राज्य अधिवास असल्याचे उमेदवार या श्रेणी अंतर्गत पात्र आहेत.
- Type - E उमेदवार / महाराष्ट्र कर्नाटक सीमा क्षेत्रातील उमेदवार - महाराष्ट्र शासनाने अधिसूचित केल्याप्रमाणे महाराष्ट्र - कर्नाटक सीमाक्षेत्रातील मान्यताप्राप्त संस्थेमधून व त्या भागातील रहिवासी असलेला ,इयत्ता एसएससी परीक्षा उत्तीर्ण झालेला ,आणि ज्याची मातृभाषा मराठी आहे असा उमेदवार (महाराष्ट्र कर्नाटक सीमा भागातील गावांची यादी संकेतस्थळावर उपलब्ध आहे.)